ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २१ | पुणें, बुधवार तारीख ८ फेब्रुवारी, १९५६ | अंक ६

## विविध माहिती

**पुस्तकांच्या भेटीची देवाण-घेवाण**—ब्रिटनचे भारतामधील हायकमिशनर श्री. मॅकडोनल्ड ह्यांनीं भारतीय साहित्य ॲकॅडमीला इंग्रजी अभिजात वाङ्मयांतील ६० पुस्तकें भेट म्हणून दिलीं आहेत. उलटपक्षीं, भारतातर्फे डॉ. राधाकृष्णन् ह्यांनीं भारतीय वाङ्मयाचीं कांहीं पुस्तकें ब्रिटिश कौन्सिल ह्या संस्थेला नजर केलीं आहेत.

**अफगाणिस्थानला रशिआचें कर्ज**—रशिआचे पंतप्रधान मार्शल बुलगॅनिन ह्यांनीं अफगाणिस्थानला भेट दिली होती. त्यावेळीं त्या देशाला १० कोटी डॉलर्सचें दीर्घ मुदतीचें कर्ज देण्याबद्दल बोलणीं झालीं होतीं. ह्या कर्जासंबंधीच्या करारावर नुकत्याच सह्या करण्यांत आल्या. कर्ज तीस वर्षांत परत करावयाचें असून परतफेडीचा पहिला हप्ता ८ वर्षांनीं द्यावयाचा आहे. व्याजाचा दर अवघा २ टक्के आहे.

**उत्तर प्रदेशांतील वीजपुरवठा**—दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत राज्यांत वीज-पुरवठा करणारीं केंद्रें व उपकेंद्रें स्थापन करण्यासाठी उत्तर-प्रदेश सरकारनें ५७ कोटी रुपये खर्च येणारी योजना तयार केली आहे. राज्यांतील औद्योगीकरण झपाट्यानें व्हावें म्हणून ती तयार करण्यांत आली आहे. खेड्यांतील घरगुती उद्योगधंद्यांना ह्या योजनेचा फायदा होईल.

**दारूच्या पुरवठ्यावरील कर**—संयुक्त-राष्ट्र-संघटनेच्या शैक्षणिक व शास्त्रीय उपसंघटनेचें अधिवेशन बंगलोर येथें चालू आहे. अधिवेशन चालू असेपर्यंत हजर असलेल्या प्रतिनिधींना पुरविण्यांत येणाऱ्या मद्यावर कर घेण्यांत येणार नाहीं, असें म्हैसूर सरकारनें एक खास गॅझेट काढून जाहीर केलें आहे.

**वृत्तपत्रांच्या कागदावर नियंत्रण**—कॅनडांतील क्विबेक प्रांताच्या कायदेमंडळांत वृत्तपत्रांना लागणाऱ्या कागदाचें उत्पादन, वांटप व विक्री ह्यांवर नियंत्रण घालणारा कायदा मंजूर करण्यांत आला आहे. प्रांताला होणाऱ्या वृत्तपत्राच्या कागदाच्या किंमतींत वाढ करण्यांत येऊं नये अशी विनंती सरकारतर्फे कारखानदारांना करण्यांत आली होती. पण त्यांनीं ती नाकारली होती. क्विबेकमध्यें वृत्तपत्राचा कागद तयार करणाऱ्या ५५ कारखान्यांची मोठी संघटना आहे.

**रशिआंतील कामाचे तास कमी होणार**—सोव्हिएट रशिआच्या नव्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कामांत कामाचे रोजचे तास आठ ऐवजीं सातच करण्यांत येण्याचा संभव आहे. ह्यासंबंधीं बोलतांना रशियाचे दुय्यम पंतप्रधान श्री. कॅगेनोव्हिच म्हणाले कीं आंतरराष्ट्रीय परिस्थिति तंग राहिली नाहीं तर रशिआ उत्पादनाच्या बाबतींत अमेरिकेला ५ ते १० वर्षांच्या अवधींत गाठूं शकेल.

**पाकिस्तानला अमेरिकेची मदत**—चालू आर्थिक वर्षांत पाकिस्तानला अमेरिकेकडून ११·७ कोटी डॉलर्सची आर्थिक मदत देण्यांत आली. गेल्या वर्षीपेक्षा हा मदतीचा आकडा ३० लाख डॉलर्सनीं अधिक आहे. पाकिस्तानमधील शेतीचा विकास करण्यासाठी उभयता देशांत बोलणीं चालूं आहेत. अधिक मदत मिळणें ह्या वाटाघाटींवर अवलंबून आहे.

**समाजविकास योजनावर होणारा खर्च**—दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत हातीं घेण्यांत येणाऱ्या समाजविकास योजनांसाठी व राष्ट्रीय-विस्तार-योजनांसाठी २०० कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. योजनांचे निरनिराळे टप्पे व इतर तपशील ह्यासंबंधीं अधिक विचार संबंधित खात्यातर्फे चालू आहे.

**म्हैसूर राज्यांतील भूदान**—म्हैसूर राज्य सरकारनें पुरस्कृत केलेल्या भूदानाच्या व विद्यादानाच्या मोहिमेंत आतांपर्यंत ३१,७३८ एकर जमीन देणग्यांच्या रूपानें गोळा झाली आहे. त्यांपैकीं बहुतेक जमिनींत चालू सालचा जून महिन्यापर्यंत लागवड करण्यांत येईल.

**कानडी भाषेंत ज्ञानकोश**—म्हैसूर राज्य सरकारच्या शिक्षण खात्यानें कानडी भाषेंतील ज्ञानकोश तयार करून तो प्रसिद्ध करण्याची योजना तयार केली आहे. ज्ञानकोशाचें सर्व खंड प्रसिद्ध करण्यास सुमारें १६ लाख रुपये खर्च येईल असा अंदाज करण्यांत आला आहे.

**झेकोस्लोव्हाकिआची पाकिस्तानला मदत**—झेकोस्लोव्हाकिआच्या सरकारनें पाकिस्तानला आर्थिक साह्य व तांत्रिक मदत देण्याची तयारी दाखविली आहे, असें समजतें. बगदाद करारांतून फुटून निघण्यासाठी ही मदत देण्यांत येत असावी असा निरीक्षकांचा अंदाज आहे. बगदाद करारांत ब्रिटन, पाकिस्तान, तुर्कस्तान, इराक व इराण हीं राष्ट्रें सामील झालेलीं आहेत.

**इराणचें काटकसरीचें धोरण**—इराणच्या अर्थमंत्र्यांनीं देशाच्या राज्यकारभारांत काटकसर करण्याचें ठरविलें आहे. जे सरकारी अधिकारी संपन्न असतील, त्यांना तीन वर्षेपर्यंत पगार मिळणार नाहीं असें पत्रक त्यांनीं काढलें आहे. इराणच्या तेलाच्या खाणींचें राष्ट्रीयीकरण करण्याबद्दल जो वाद माजला त्यामुळें त्या देशाची आर्थिक स्थिति घसरलेली आहे.

**तिबेटमधील पहिलें वृत्तपत्र**—चिनी सरकारनें तिबेटमध्यें ल्हासा ह्या ठिकाणीं अगदीं आधुनिक पद्धतीच्या छापखान्याची स्थापना केली आहे. तिबेटमधील पहिलें वृत्तपत्र छापून काढण्यासाठी छापखान्याचा उपयोग केला जाणार आहे.

## पांच वर्षांत ३०६·७ कोटी रु. ची परकीय मदत

### अमेरिका, कानडा, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, नॉर्वे व फोर्ड फौंडेशन ह्यांचा हातभार

भारतास साह्य देणाऱ्या देशांत व संघटनांत अमेरिका, कानडा, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, नॉर्वे व फोर्ड फौंडेशन यांचा समावेश होतो.

या देशास मार्च १९५१ ते जानेवारी १९५६ पर्यंत एकूण ३०६·७ कोटी रु. चें साह्य झालें आहे. यापैकी १४४·६ कोटी रु. पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या चार वर्षांत वापरण्यांत आले. चालू वर्षांत आणखी ५० कोटी रु. चा विनियोग होण्याचा अंदाज असून बाकीची ११२·१ कोटी रु. रक्कम दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत खर्चण्यांत येईल.

या कालांत अमेरिकेनें एकूण २९४० लक्ष डॉलरचें अधिकृत साह्य दिलें व तें मिळण्याची तरतूद केली. या रकमेंत तंत्रज्ञांचा पगार व वाहतूकखर्च, कारभारात्मक खर्च व १९५१–५२ मध्यें भारतास गव्हासाठीं दिलेले १९०० लक्ष डॉलर यांचा समावेश होत नाहीं. १९५४–५५ मध्यें त्या देशाकडून विकासकार्यासाठी एकूण ६०५ लक्ष डॉलरचें व तांत्रिक सहकार्यासाठी १५२ लक्ष डॉलरचें साह्य मिळालें. १९५४–५५ मध्यें मिळालेल्या साह्यापैकी ४५० लक्ष डॉलर कर्जाच्या स्वरूपांत असून ते ४० वर्षांत ४ टक्के दरानें रुपयांत फेडावयाचें आहे. अमेरिकन सरकारनें चालू वर्षासाठी ५० लक्ष डॉलर साह्य मंजूर केलें असून मागील वर्षाप्रमाणें त्यांतील बराच हिस्सा कर्जाच्या स्वरूपांत देण्यांत येईल. या रकमेचा विनियोग करण्याच्या योजनांवर विचारविनिमय करण्यांत येत आहे.

आतांपर्यंत ही रक्कम खतें, शेतकीच्या औद्योगिक वापराकरितां आवश्यक असें लोखंड व पोलाद यांची आयात, ३,००० उत्पादक व प्रायोगिक नलिकाविहिरी, वाहनें, शेतीचीं अवजारें, इत्यादींसाठी वापरण्यांत आलीं आहेत. तसेंच या रकमेंतील कांहीं भाग पाटबंधारे व विद्युत्‌योजनांस आवश्यक अशी सामुग्री मिळविण्यासाठी आणि त्याचप्रमाणें औद्योगिक, शेतकीविषयक, वैद्यकीय, शैक्षणिक व आरोग्य संशोधन योजनांस लागणाऱ्या मालाच्या पुरवठ्यासाठींहि वापरण्यांत आला आहे. या मदतींतूनच १०० रेल्वे इंजिनें व ८,००० वाघिणी मिळविण्यांत आल्या आहेत.

ऑस्ट्रेलियानें १९५१–५५ या कालांत ९६ लक्ष ऑस्ट्रेलियन पौंडांचें अधिकृत भांडवली साह्य केलें. पहिल्या वर्षांतील मिळालेली मदत ३७ लक्ष ऑस्ट्रेलियन पौंड किंमतीचा गहूं व आटा खरेदी करण्यासाठी वापरण्यांत आली. हा गहूं विकून आलेली रक्कम (रुपयांत) तुंगभद्रा योजनेवरील खर्चासाठी मुकर करण्यांत आली. १९५२–५३ मध्यें मिळालेली १२० लक्ष पौंडांची मदत त्याच योजनेवर होणाऱ्या बांधकामासाठी आणि रामागुंडम योजनेस लागणाऱ्या विद्युत्‌सामुग्रीकरितां वापरण्यांत आली. त्यानंतर मिळालेली ११० लक्ष पौंड मदत आकाशवाणीच्या यंत्रसामुग्रीसाठी, तसेंच डिझेल गाड्या व वाघिणी यांवर खर्चण्यांत आली.

कानडानें आतांपर्यंत भारतास जवळ जवळ ७७० लक्ष डॉलरचें साह्य केलें आहे. त्या देशानें गव्हाचा पुरवठा केला व गव्हाची विक्री करून आलेली १५० लक्ष डॉलर रक्कम मयुराक्षी योजनेवर खर्च केली. त्याशिवाय ३० लक्ष डॉलरची विद्युत् यंत्रसामुग्री पुरवून तो देश या योजनेस अप्रत्यक्ष रीत्या साह्य करीत आहेच. त्या देशांकडून मिळणाऱ्या मदतींचा वाहनें, रेल्वे इंजिनें व बॉयलर, केबल व वायर धंद्यांस आवश्यक असे [illegible] कॉपर व ॲल्युमिनियम बार्स आणि आसामांतील एका जलविद्युत् योजनेस लागणारी विद्युत्‌सामुग्री यांच्या पुरवठ्यासाठींहि विनियोग करण्यांत येत आहे. त्याचप्रमाणें कच्चा माल व यंत्रसामुग्रीचा पुरवठा करून वीज विकासाकरितांहि कानडाच्या मदतीचा उपयोग करण्यांत आला आहे. चालू वर्षासाठी त्या देशानें १३० लक्ष डॉलर साहाय्य दिलें असून जयसलमीर विभागांत तेलाचा शोध करण्याच्या कामावर ही रक्कम खर्चण्यांत येईल. तसेंच टोळधाड नियंत्रणकार्यासाठी, २ बव्हेर विमानें व एका विद्युत् योजनेकरितां यंत्रसामुग्रीहि कानडा देत आहे. ह्याशिवाय त्या देशाच्या सरकारनें मुंबई येथील अणुसंशोधन केंद्रास ७० लक्ष डॉलरचा एक रीॲक्टरहि देण्याचें ठरविलें आहे.

कोलंबो योजनेस सुरुवात झाली तेव्हां न्यूझिलंडनें दि ऑल इंडिया मेडिकल इन्स्टिटयूटच्या भांडवली खर्चाचा कांहीं भाग म्हणून ३ वर्षांसाठी १० लाख पौंडांचें साह्य दिलें. या रकमेपैकी आतांपर्यंत केवळ २,५०,००० पौंड खर्च झाले असले तरी बाकीची १९५६–५७ व १९५७–५८ मध्यें वापरण्यांत यावी. त्याशिवाय न्यूझिलंड सरकारनें १९५४–५५ मध्यें भारतांतील दुग्धोत्पादन योजनांस आवश्यक अशा यंत्रसामुग्रीच्या खरेदीसाठी आणखी ४ लाख पौंड देऊं केले असून त्यांचा विनियोग करण्याच्या योजनांचा विचार चालू आहे.

फोर्ड फौंडेशननें सप्टेंबर १९५१ पासून जवळजवळ ८० लक्ष डॉलरचें साह्य केलें आहे. ही रक्कम ग्रामीण विकासकार्यकर्त्यांचें प्रशिक्षण, छोटे उद्योगधंदे, शिक्षण, सार्वजनिक कारभार, संशोधन व सांस्कृतिक देवाणघेवाणीचा कार्यक्रम यांवर खर्च होत आहे.

नॉर्वेजियन सरकारशीं आणखी १० लाख क्रोन रकमेचा विनियोग करण्यासंबंधीं एक करार करण्यांत आला आहे. या करारानुसार त्रावणकोर–कोचीन राज्यांतील मच्छिमार धंद्याच्या विकासार्थ ही रक्कम खर्चण्यांत येईल.

भारतास आंतरराष्ट्रीय बँकेकडून १९५४–५५ पूर्वी मिळालेल्या वर्षांतील सुमारें १८० लक्ष डॉलर शेतकी सामुग्री, दामोदर नदी योजना व पोलादाचा कारखाना यांवर खर्चण्यांत आली आहे. चालू वर्षांत त्या बँकेकडून १६२ लक्ष डॉलरचें ट्राम्बे योजना कर्ज व १०० लक्ष डॉलरचें नव्यानें स्थापना झालेल्या इंडस्ट्रियल क्रेडिट ॲण्ड इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशन कर्ज अशीं दोन कर्जें मिळालीं आहेत.

### तांत्रिक साह्य

कोलंबो योजना, भारत–अमेरिका तांत्रिक सहकार्य कार्यक्रम व युनोचा तांत्रिक साह्य-कार्यक्रम यांनुसार भारतास तांत्रिक साह्य मिळालें आहे. तांत्रिक सहकार्य योजनेनुसार राष्ट्रकुल देशांनीं तांत्रिक संस्थांस व संशोधनकेंद्रांस ६० लक्ष रु. ची यंत्रसामुग्री आतांपर्यंत पाठविली आहे. यांतील बराच भाग इंग्लंडकडून येत आहे. युनोच्या तांत्रिक साह्य-कार्यक्रमानुसार आतांपर्यंत ५०,६१५ डॉलरची यंत्रसामुग्री मिळाली आहे.

जून १९५५ अखेरीपर्यंत ऑस्ट्रेलिया, कानडा, न्यूझिलंड व जपान या देशांत एकूण ५२२ भारतीय विद्यार्थ्यांस शिक्षणाची सोय करून देण्यांत आली आहे. त्याशिवाय भारतानें भारत–अमेरिका तांत्रिक सहकार्य-योजनेनुसार ८२ तज्ज्ञांचें साह्य घेतलें आहे. याच योजनेनुसार अमेरिकेनें ४०३ भारतीय विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय केली आहे. युनोच्या कार्यक्रमानुसार इतर देशांत १९१ भारतीय तंत्रज्ञ पाठविण्यांत आले आहेत.

# अर्थ

बुधवार, ता. ८ फेब्रुवारी, १९५६



*संस्थापक :*
प्रो. वामन गोविंद काळे

*संपादक :*
श्रीपाद वामन काळे


## रशिआच्या आर्थिक स्पर्धेचें स्वरूप

गेल्या कांहीं महिन्यांत रशिआनें आशिआमधील अविकासित राष्ट्रांना आर्थिक मदत व तांत्रिक साह्य देण्याच्या कामीं ब्रिटन, अमेरिकेसारख्या पाश्चात्य राष्ट्रांशीं स्पर्धा आरंभिली आहे. ह्या स्पर्धेचें क्षेत्र आशिआपुरतेंच मर्यादित नसून दक्षिण अमेरिकेंतील देशहि स्पर्धेच्या कक्षेंत आलेले आहेत. रशिअन राज्यकर्त्यांनीं शांततामय सहजीवनाचें जें धोरण स्वीकारलेलें दिसत आहे त्या धोरणापोटींच आर्थिक स्पर्धेचा उगम झालेला आहे. म्हणून सहजीवनाच्या धोरणाचें महत्त्व समजण्यासाठीं आर्थिक स्पर्धेचें स्वरूपहि अवलोकन करणें जरूर आहे.

दक्षिण अमेरिकेंतील देशांची आर्थिक परिस्थिति अस्थिर झालेली आहे. त्यामुळें रशिआनें देऊं केलेल्या मुदतीची भुलावण पडून तेथील अमेरिकेचा प्रभाव कमी होण्याची भीति अमेरिकन निरीक्षकच व्यक्त करूं लागले आहेत. दक्षिण अमेरिकेंत आतां-पर्यंत अमेरिकेचेंच सर्वस्वीं वर्चस्व होतें हें मुद्दाम लक्षांत ठेवलें पाहिजे. रशिआचे पंतप्रधान मार्शल बुल्गॅनिन ह्यांनीं एका मुलाखतींत दक्षिण अमेरिकेंतील देशांशीं व्यापारी व राजनैतिक संबंध प्रस्थापित करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. ह्या देशांत पडून असलेला शेतीचा व खाणींचा माल विकत घेऊन त्याच्या बदला निरनिराळ्या प्रकारची यंत्रसामुग्री पुरविण्याची तयारीहि त्यांनीं दाखविली आहे. तथापि, यंत्रसाहित्य पुरविण्याच्या तयारी-पेक्षांहि त्यांच्याकडून माल विकत घेण्याचा पवित्रा दक्षिण अमेरिकेंतील देशांना आकर्षक वाटण्याचा फार संभव आहे. कारण, त्यांच्या जवळील वरकड माल अमेरिका घेऊं शकत नाहीं. खुद्द अमेरिकेंतच शेतीचा माल विपुल झाल्यामुळें भाव घसरूं न देण्यासाठीं सरकारला त्याची खरेदी करावी लागत आहे. बहुतेक दक्षिण अमेरिकेंतील देशांत साखर, कॉफी आणि केळीं ह्या सारखा शेतीचा माल प्रचंड प्रमाणांत सांठून राहिलेला आहे. ब्राझिल व चिली ह्या देशांत चलनवृद्धि शिगेला पोंचलेली आहे. अर्जेंटायनासारख्या कांहीं देशांत राजकीय परिस्थिति इतकी चंचल आहे कीं कोणत्या क्षणाला काय होईल तें सांगणें कठीण आहे. युरोग्वायचे अध्यक्ष नुकतेंच अमेरिकेला गेले असतांना त्यांनीं असें स्वच्छच सांगितलें कीं दक्षिण अमेरिकेंतील शिलकी माल अमेरिका घेणार नसेल तर आम्ही तो इतर गिऱ्हाइकांना विकूं. युराग्वायमध्यें गोठविलेलें मांस व गहूं ह्यांचा सुकाळ आहे. कांहीं महिन्यांपूर्वीं अमेरिकेनें आपल्या जवळील शिलकी गहू ब्राझिलला गैरवाजवी भाव घेऊन विकला. ब्राझिल ही बाजारपेठ आपली असल्याचा युरॉग्विअन सरकारचा दावा आहे. ह्यामुळें अमेरिकेनें केलेल्या सौद्याचा त्या सरकारला राग आलेला आहे. रशिआनें देऊं केलेल्या यंत्रसाहित्यांत तेलाच्या विहिरींची यंत्र-सामुग्रीहि आहे. दक्षिण अमेरिकेंतील बहुतेक तेलाच्या कंपन्या अमेरिकन भांडवलाच्या आहेत. पण ब्राझिल व अर्जेंटायना-सारख्या देशांना तेलाच्या विहिरींवर आपली मालकी असावी असें वाटतें. अर्जेंटायनाचा माजी हुकूमशहा पदच्युत होण्यास हें तेलाचें राजकारणहि जबाबदार आहे. प्रे. पेरॉ ह्यांनीं अर्जेंटायनामधील तेलाच्या खाणी चालविण्याचा मक्ता स्टँडर्ड ऑइल कंपनीला दिला. प्रे. पेरॉ ह्यांना पदच्युत करणाऱ्या नवीन राज-वटीनें पहिल्या प्रथम अमेरिकन कंपनीशीं असलेला करार रद्द करून टाकला. अमेरिकन कारखानदार दक्षिण अमेरिकेंतील देशांना तेल उपसण्याची यंत्रसामुग्री देण्यास तयार आहेत. पण त्यांना तेल उपसण्याची मक्तेदारी मोबदल्यांत पाहिजे आहे. उलटपक्षीं, रशिया कांहींहि अटी न घालतां ही यंत्रसामुग्री देण्यास तयार आहे.

सध्यां दक्षिण अमेरिकेंतील देशांचा रशिआशीं फारसा व्यापार चालत नाहीं. तथापि पूर्व युरोपांतील देशांशीं मात्र त्यांचे व्यापारी संबंध आहेत. अर्जेंटायनाकडून मांस, कातडी, अळशीचें तेल, पूर्व-युरोपांत जातें. ब्राझिल, कापूस, लोकर, कॉफी व कोको ह्यांची निर्यात करतो. मेक्सिको कॉफी निर्यात करतो आणि युरॉग्वाय गोठलेलें मांस निर्यात करतो. दक्षिण अमेरिकेंतील देशांचें सध्यां जे व्यापारीकरार आहेत त्याप्रमाणे त्यांचा कम्युनिस्ट राष्ट्रांशीं होणारा व्यापार दरसाल अवघ्या ५ कोटी डॉलर्सचा होतो. अमेरिकेशीं मात्र दरसाल सुमारें ३५ कोटी डॉलर्सचा व्यापार होतो. अमेरिका त्या देशांच्या निगत व्यापारां-तील ४० टक्के माल घेते. त्याशिवाय तेलाच्या धंद्यांत अमेरिकेनें ३५ ते ४० कोटी डॉलर्स भांडवल गुंतविलेलें आहे. रशिआनें देऊं केलेल्या मदतीचा हेतु मदत घेणाऱ्या देशांतील लोकांचें राहणीचें मान वाढावें असाच केवळ असेल असें मानतां येणें कठीण आहे. पण मदतीच्या अटी सौम्य व सोयीच्या असतील तर आर्थिक दृष्ट्या अप्रगत असलेल्या देशांना मदत न स्वीका-रणें अवघड जाईल. पाश्चात्य राष्ट्रें व कम्युनिस्ट राष्ट्रें ह्यांच्यांत चाललेल्या शीतयुद्धांतीलच हा एक पवित्रा आहे, असें म्हणतां येण्यासारखें आहे. तरीसुद्धां राष्ट्रें अर्थाची दास असतात अगर होतात. हें विसरून चालणार नाहीं. शिवाय अणुबॉम्ब्स अगर हैड्रोजन बॉम्ब्स ह्यांच्या साह्यानें सूर्याच्या उष्णतेनें युद्ध करण्या-पेक्षा आर्थिक मदतीचें शीतयुद्ध जगाला अधिक परवडेल हें उघड आहे. अमेरिकेंतील राजकीय अभ्यासकांना रशिअन संबंधा-वर आधारलेल्या राजनैतिक चढाईचीच अधिक भीति वाटूं लागली आहे असें दिसतें.

**ऑस्ट्रेलिआंतील संपाचा परिणाम**—ऑस्ट्रेलिआच्या बंदरांतील २४,००० गोदीकामगारांनीं वेतनवाढीसाठीं संप केल्यामुळें इतर उद्योगधंद्यांतील कामगारांना झळ पोंचूं लागली आहे. कोळशाची वहातूक करणाऱ्या बोटींचा तुटवडा पडल्यामुळें खाणी बंद पडूं लागल्या आहेत. १०,००० खाणीकामगारांना कामावरून कमी करण्यांत येण्याचा संभव आहे.

**चंदीगड येथील नवा विमानतळ**—पंजाबची राजधानी चंदीगड येथें बांधण्यांत येत असलेला विमानतळ आतां पूर्ण झाला आहे. विमानतळ अपेक्षेपेक्षा ६ महिने आधींच तयार झाला. ता बांधण्यासाठीं १३ लाख रुपये खर्च आला असून ता. १८ पासून तो औपचारिक रीत्या खुला करण्यांत येईल.

## दारूबंदीमुळें आर्थिक व सामाजिक परिस्थितींत सुधारणा

मागासलेल्या वर्गांच्या कांहीं लोकांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीविषयीं मुंबई सरकारनें नमुन्यादाखल जी पाहणी केली तीवरून दारूबंदीमुळें या कुटुंबाची एकंदर परिस्थिति बरीच सुधारली असल्याचें दिसून येतें. या पाहणीसाठी ज्यांना दारूचें व्यसन होतें अशा इसमांच्या कुटुंबांची निवड करण्यांत आली होती.

गेल्या सप्टेंबर अखेरपर्यंतच्या तिमाहींत ९० गांवांतील एकूण २८८ कुटुंबांची पाहणी करण्यांत आली. हीं कुटुंबें पुढील जिल्ह्यांतील होतीं. अमरेली, अहमदाबाद, बनासकांठा, मेहसाणा, सुरत, भडोच, बडोदें, पंचमहाल, पूर्व खानदेश, पश्चिम खानदेश, ठाणें, सोलापूर, उत्तर सातारा, कोल्हापूर, कारवार आणि विजापूर,

या कुटुंबांपैकी दारूबंदी सुरू होण्यापूर्वी ५५१ लोकांना दारूचें व्यसन होतें. यांपैकी ५४० लोकांनीं दारू सोडली असून आठांनीं अंशत: सोडली आहे आणि उरलेले तिघे अजून दारू पितात असें समजतें.

ज्या ५४० इसमांनीं दारू सोडली, त्यापैकी ५३४ इसमांनीं दारूबंदी झाल्यामुळें ती सोडली.

### जमीन खरेदी केली

पाहणी करण्यांत आलेल्या कुटुंबांपैकी दोन इसमांनीं १,००० रुपयांची, एकानें १,५०० रुपयांची आणि एकानें ७०० रुपयांची जमीन खरेदी केली. ४७ कुटुंबांनीं आपलें कर्ज फेडलें होतें. एका कुटुंबानें तर सुमारें २,००० रुपये देणें फेडलें, तर इतर चार कुटुंबांनीं आपलें प्रत्येकीं १,००० रुपयांचें देणें फेडलें. सात कुटुंबांनीं आपापलीं रु. २५० ते रु. ८०० पर्यंतचीं कर्जें फेडलीं.

दारूबंदी अंमलांत आल्यामुळें जी शिल्लक पडली त्यांतून ८२ कुटुंबांनीं कपडे, दागिने, भांडीकुंडीं, गुरें, वगैरे खरेदी केलीं, २२ कुटुंबांनीं आपलीं शिल्लक घरें खरेदी करणें, बांधणें आणि दुरुस्त करणें यावर खर्च केली.

### महत्त्वाचे फायदे

दारूबंदीमुळें विशेष फायदे शिक्षण, आरोग्य आणि कौटुंबिक जीवन या क्षेत्रांत दिसून येतात. पूर्वी ८८ कुटुंबांतील मुलांना त्यांच्या आईबापांच्या व्यसनामुळें शिक्षण मिळत नसे; परंतु आतां त्यांना शाळेंत पाठविण्यांत येतें. तसेंच, पाहणी करण्यांत आलेल्या २८८ कुटुंबांपैकी २३३ कुटुंबांनीं, आपल्या कुटुंबांत दारूबंदीपूर्वी रोगराई होती परंतु दारूबंदीनंतर आपली प्रकृति सुधारली, असें सांगितलें. २८६ कुटुंबांतील स्त्रियांनीं दारूबंदीचें स्वागत केलें आणि आतां कुटुंबांमध्यें भांडणतंटे फारच कमी होतात असें सांगितलें. आतां आपण सुखी झालों आहोंत. असेंहि त्या म्हणाल्या.

---

**संस्थानी राजवाड्याची विक्री**—सौराष्ट्रांतील लाठी ह्या संस्थानच्या माजी अधिपतींनीं आपला राजवाडा राज्य सरकारला अवघे २०,००० रुपये घेऊन विकून टाकला आहे. ह्या राजवाड्यांत आतां मागासलेल्या वर्गांतील विद्यार्थ्यांसाठी एक वसतिगृह चालू करण्यांत येणार आहे. अशाच प्रकारचीं आणखी दोन वसतिगृहें पतियाळा व भावनगर येथेंहि उघडण्यांत येणार आहेत.

## ओरिएंटलच्या कोष्टकाप्रमाणें सर्व विमे

### हप्त्यांत दर हजाराच्या विम्यास १ रुपयाची घट

भारत सरकारनें एक प्रेसनोट काढून जाहीर केलें आहे, कीं ह्यापुढें सर्व आयुर्विमा कंपन्यांचे हप्त्यांचे दर व विम्याच्या अटी ह्या सारख्याच रहातील. २० जानेवारी, १९५६ रोजीं व त्यानंतर उतरलेल्या विम्यांस हे नवे दर व नव्या अटी लागू होतील. ओरिएंटल विमा कंपनीचे जे दर होते, त्यांत दर हजाराच्या विम्यास १ रुपया अशी हप्त्यांत कपात करून, ह्या नव्या दरानें विमे स्वीकारण्यांत येतील. ओरिएंटलच्या प्रॉस्पेक्टसमध्यें जीं कोष्टकें आहेत, त्याखेरीज इतर कोष्टकांवर आधारलेले विमे तूर्त स्वीकारले जाणार नाहींत. भारताबाहेरील विम्यास हप्त्यांचे चालू दरच लागू केले जातील. एजंटांना ओरिएंटलच्या दराप्रमाणें कमिशन मिळेल. सध्यांची एजंटांची संख्या जरूरीपेक्षा अधिक आहे, तेव्हां त्यांपैकी कांहींना ग्रामीण भागांत काम करण्यास सांगण्याचा सरकारचा विचार आहे. विमा कंपन्यांत सध्यां काम करीत असलेल्या नोकरांना शक्यतों कामावर ठेवण्याची सरकारची कल्पना आहे, असें दुय्यम अर्थमंत्री श्री. भगत ह्यांनीं नोकरांच्या एका शिष्टमंडळाला सांगितलें.

---

### इन्स्टिटयूटचे नवे अध्यक्ष व उपाध्यक्ष

मुंबई प्रां. सहकारी इन्स्टिटयूटचे चेअरमन, श्री. जनार्दन आत्माराम मदन हे प्रकृतीच्या कारणास्तव गेल्या महिन्यांत निवृत्त झाले. त्यांच्या जागीं व्हाइस चेअरमन श्री. वैकुंठराय मेहता हे निवडण्यांत आले व व्हाइस चेअरमनच्या जागीं प्रा. द. गो. कर्वे ह्यांची निवडणूक झाली. श्री. मदन हे १९४२ सालीं सरकारी नोकरींतून निवृत्त झाले, तेव्हांपासून सतत ते इन्स्टिटयूटचे चेअरमन होते. सरकारी नोकरींत असतांना कांहीं वर्षें असिस्टंट रजिस्ट्रार व रजिस्ट्रार होते. शेतकी कमिशनचे जॉइंट सेक्रेटरी म्हणून १९२६ सालीं त्यांची नेमणूक झाली. पुढें १९२९ सालीं, प्रांतिक बँकिंग चौकशी कमिटीचे अध्यक्ष म्हणून त्यांनीं काम केलें. रेव्हेन्यू खात्याचे सेक्रेटरी, कमिशनर, गव्हर्नरांचे अडव्हायसर, पब्लिक सर्व्हिस कमिशनचे चेअरमन, इत्यादि नात्यांनींहि त्यांनीं कामें केलीं होतीं.

---

**ऑस्ट्रेलियाकडून मालवाहू डबे**—कोलंबो मदत योजनेप्रमाणें भारतीय रेल्वेसाठी २,००० मालवाहू डब्यांची मागणी ऑस्ट्रेलिआंतील टामलिनसन स्टील लि. ह्या सर्वांत मोठ्या व जुन्या कारखान्याकडे नोंदविण्यांत आली आहे. हा कारखाना पश्चिम ऑस्ट्रेलिआंत पर्थ ह्या शहरांत आहे. मालवाहू डब्यांची किंमत सुमारें २५ लाख ऑस्ट्रेलिअन पौंड होईल.

**मद्रास शहरांतील रिक्षा**—मद्रास शहरांत पायी ओढण्यांत येणाऱ्या व सायकलवरून ओढण्यांत येणाऱ्या रिक्षा चालू आहेत. अशा प्रकारच्या रिक्षांना ह्यापुढें परवाने देण्यांत येऊं नयेत, असा हुकूम मद्रास सरकारनें पोलिस खात्याला दिला आहे. यंत्रांच्या साह्यानें धांवणाऱ्या व फारसा आवाज न करणाऱ्या रिक्षा शहरांत चालू करण्यांत येणार आहेत.

**मच्छीमारीसाठी कंपनी**—मुंबई येथें ' न्यू इंडिआ फिशरीज लि. ' ह्या नांवाची कंपनी जपानच्या सहकार्यानें स्थापन करण्यांत आली आहे. कंपनीचें अधिकृत भांडवल १ कोटी रुपयांचें आहे. मुंबईच्या आसपासच्या समुद्रांत दूर अंतरावर जाऊन मच्छीमारीचा धंदा करण्यासाठी कंपनी दोन खास बोटी वापरणार आहे.

## आयुर्विम्याचें राष्ट्रीयीकरण

**( वेस्टर्न इंडियाचे ॲक्चुअरी श्री. ज. रा. जोशी यांची "दैनिक संजया" साठी श्री. त्रं. रा. अभंग ह्यांनीं घेतलेली मुलाखत )**

राष्ट्रीयीकरण अजून झालें नाहीं. तें करण्याच्या दृष्टीनें सरकारनें हें पहिलें पाऊल टाकलें आहे. म्हणजे संचालकांचा अधिकार संपून तो सरकारनें आपल्याकडे घेण्याचें ठरविलें व त्या दृष्टीनें वटहुकूम काढून प्रत्येक कंपनीकडे आपला प्रतिनिधी पाठवून आपणांकडे फक्त चालकत्व घेतलें.

एकदां राष्ट्रीयीकरण करण्याचें ठरल्यावर हें पहिलें पाऊल सरकारनें विद्युत् वेगानें टाकलें. तें विमेदारांच्या हिताच्या दृष्टीनें योग्य असेंच केलें असेंच म्हणलें पाहिजे. कोणाहि चालकाकडून विमेदाराचे हिताला बाधक अशी गोष्ट घडण्यास अवसर मिळूं नये म्हणून असें करणें आवश्यक होतें. नाहीं तर आधीं त्यावर चर्चा, नंतर निर्णय व नंतर तो अंमलांत येण्याची पूर्वसूचना असा मार्ग अवलंबिला असता, तर कित्येकांकडून अयोग्य व्यक्तींचे विमे उतरणें, आपल्या हितसंबंधीयाचे पगार भरससाट वाढवून ठेवणें, इमारती खरेदी करणें, अशा प्रकारच्या गोष्टी घडून विमेदाराच्या हितास बाध येण्याचा संभव उत्पन्न झाला असता.

पाऊल सरकारनें इतके वेगानें टाकलें कीं अर्थमंत्र्यांचें नभोवाणीवर ज्या रात्रीं भाषण झालें त्याच्या आधींच त्यांचा प्रतिनिधी मुंबई, मद्रास, कलकत्ता, वगैरे मोठमोठ्या शहरीं दाखल होऊन कोणी कोठें जायचें व कोणकोणत्या कंपन्यांचा चार्ज घ्यावयाचा, कोण कस्टोडियन, कोणत्या भागांत जावयाचे, ठरलें होतें व वटहुकूम जाहीर होण्याच्या दिवशींच ठिकठिकाणीं सरकारी प्रतिनिधी सकाळीं ११–११॥ लाच कंपनीच्या दारांत हजर झाला व त्यानें लगेच आपल्या कामाचा चार्ज घेतला. आतां नंतर कस्टोडिअन्स ठिकठिकाणीं जातील व १।२ दिवसांत आपापलें काम पाहूं लागतील. मग तात्पुरता प्रतिनिधी व संचालक यांचा सर्व अधिकार संपून ते सर्व अधिकार कस्टोडिअनकडे येतील.

लोकसभेंत यासंबंधीं बिल येऊन, त्याचा तपशील ठरून, कायद्यांत रूपांतर होऊन त्याचप्रमाणें अंमलांत यावयाची व्यवस्था सुरू होईपर्यंत हे कस्टोडिअन आपलें काम पहातील. नंतर ते जाऊन नवीन व्यवस्था अंमलांत येईल. कस्टोडिअनमार्फतची ही व्यवस्था देखील तात्पुरतीच व्यवस्था आहे.

याबाबत भागीदारांना योग्य भरपाई विमेदारांचे हितसंबंध, नोकरवर्गाचे संबंध एजंटस वगैरेचे संबंध पूर्वीतच राहतील असें सरकारचें आश्वासन आहे.

एक मध्यवर्ती विमा कचेरी व इतर सर्वच शाखा अगर राज्य–निहाय एक मुख्य ऑफिस व इतर ठिकठिकाणीं शाखा-कचेऱ्या असतील. एकच मध्यवर्ती कचेरी व इतर देशभर शाखा असें झाल्यास एकच हप्त्याचे–बोनसचे दर असतील व राज्यनिहाय कचेऱ्या झाल्यास प्रत्येक राज्य–हप्त्याचे अगर बोनसचे दर वेगळे वेगळे असतील.

त्या त्या राज्यांत मात्र एकच व्यवस्था, नियम व दर असतील. त्यावेळीं एकहि कंपनी अस्तित्वांत स्वतंत्रपणें असणार नाहीं. तोंपर्यंत मात्र आहेत. या कंपन्या स्वतंत्रपणें तशाच अस्तित्वांत असणार व त्यांची व्यवस्था सरकारी आदेशानुसार कस्टोडिअन पाहणार आहेत.

सरकार आपल्या क्षेत्रांत कंपन्यांच्या पैशाचा उपयोग करणार आहेच. आजवर याचा निर्णय संचालकमंडळें करीत असत. आतां तो सरकार करणार. सरकारला योग्य वाटेल त्याप्रमाणें रक्कम गुंतविली जाणार व ती अशा रीतीनें कीं जी दुसऱ्या पंचवार्षिक योजनेला उपकारक होईल.

कमिशनवर काम मिळवणें अवलंबून ठेवल्यास कामांची वाढहि होऊं शकेल. पण ती वाढ होण्यास एजंटला प्रोत्साहान व योग्य ती मदत देऊं शकतील व कामाच्या वाढीचें चीज करतील असे अधिकारी ठिकठिकाणीं नेमून आत्मीयतेनें, तत्परतेनें लक्ष ठेवतील तरच वाढ होऊं शकेल. मग या विभागांतील कामांत प्रशंसनीय वाढ होऊं शकेल.

आपल्या विभागांतले कामांत प्रशंसनीय वाढ झाल्यास आपलें क्रेडिट वाढतें आहे असें अधिकाऱ्यांना वाटून त्याप्रमाणें त्यांचेकडून कामास चालना मिळत राहिल्यास वाढ होऊं शकेल. नाहींतर नोकरीचीं वर्षें अधिकाधिक होत आहेत व ठराविक प्रमाणांत नियमाप्रमाणें पगारांत वाढ होणारच आहे, असें झाल्यास कामांत शिथिलताहि येणें शक्य आहे.

पूर्वींचे संचालक आपल्या कंपनीस दरवर्षी वाढतें काम मिळावें, आपल्या कंपनीचें नांव मोठें व्हावें म्हणून गतवर्षी काम किती झालें, या वर्षीं काम किती झालें, किती वाढ वर्षाअखेरपर्यंत आणखी होऊं शकेल, वाढ कोणत्या भागांतून होत आहे, कोठें होत नाहीं, ती कां होत नाहीं, वाढ होण्यास काय उपाययोजना करावी, यावर बारीक नजर एकसारखी ठेऊन जरूर ती व्यवस्था करीत असत, अन् जें काम मिळतें आहे, तें चांगल्या दर्जाचें मिळतें आहेना ? त्यांत कांहीं वैगुण्य नाहीं ना ? असल्यास कंपनीचें नांव जाईल, वगैरे गोष्टींवरहि करडी नजर ठेवीत असत व कंपन्या नांवारूपास आणीत असत. या दृष्टीनें सरकारी यंत्रणेंत जितकी योग्य तोड निघेल त्यावर हा धंदा वाढणें अगर घटणें अवलंबून आहे. आणखी एक अनुकूल गोष्ट म्हणजे अनेक कंपन्या असल्यामुळें स्पर्धा लागून कांहींना काम मिळेल, कांहींना मिळवायचें नाहीं ही परिस्थिति बदलून कोणाहि चांगल्या एजंटाला काम मिळण्यास यापुढें ही स्पर्धा आड येणार नाहीं.

सरकारी व इतर क्षेत्रांत वैयक्तिक गुणाला क्वचितच प्रोत्साहन मिळते. बहुधा गळचेपीच होते. त्यास आयुर्विमा हें क्षेत्र अपवाद ठरल्यास तें एक सुभाग्य ठरेल. याबाबत अर्थमंत्री श्री. देशमुख यांनीं दिलेलें आश्वासन पाळलें गेल्यास उत्तम होईल.

कायदा अमलांत येऊन त्याप्रमाणें राष्ट्रीयीकरणाची व्यवस्था सुरू झाल्यावर विमेदाराला कर्ज अगर क्लेमचे पैसे सध्या कंपन्या आपला नांवलौकिक वाढावा व विमेदारांचीहि सोय लवकरच व्हावी म्हणून त्वरेनें देतात. त्याच त्वरेनें आतां राज्यनिहाय व्यवस्था झाल्यास अगर मध्यवर्ती एकच कचेरी व शाखा अशी व्यवस्था झाल्यास प्रत्येक विभागास अगर जिल्ह्यास वरील काम चालणारी कचेरी असावी व तेथें सर्वसाधारण म्हणजे वैगुण्यरहित क्लेम्स तिथल्या मुख्याधिकाऱ्यानें लगोलग सेटल करावे. अगदीं शंकास्पद असतील तेवढेंच वर विचारार्थ व निर्णयार्थ पाठवावे. तो मुख्याधिकारी याबाबतचा कायदा पूर्ण जाणणारा असावा; व कांहीं तांत्रिक अपुरेपणा असल्यास त्यानें तो आपल्या कचेरींत विमेदारांकडून पुरा करून घ्यावा म्हणजे मध्यवर्ती कचेरीवर कामाचा ताण पडणार नाहीं व त्यामुळें विलंब, पत्रव्यवहार व वारंवार हेलपाटे या यातना विमेदाराला सोसाव्या लागणार नाहींत.

आधीं वटहुकुमानें राष्ट्रीयीकरणास सुरुवात करून नंतर लोकसभेंत बिल येऊन त्यावर चर्चा होऊन तपशील ठरवावयाचा व नंतर कायद्यांत रूपांतर करावयाचें असा उलटा क्रम अवलंबिण्यांत सरकारकडून लोकशाहीची पायमल्ली होऊन त्यायोगें त्यानें हुकूमशाहीचा एवढ्यापुरतां कां होईना अवलंब केला, असा आक्षेप घेणें अस्थानीं आहे. कारण सरकार हें जे निवडून आले आहेत ते लोक प्रतिनिधींनीं निवडून दिलेलेच असल्यानें त्यांचा निर्णय हा लोकशाहीस सोडून झाला असें होऊं शकत नाहीं. आधीं चर्चा केलीच पाहिजे असें नाहीं. किंबहुना या चर्चेच्या कालावधींत आतांची सुव्यवस्था सर्वच कंपन्यांत अमलबजावणी सुरू होण्यापर्यन्त राहूं शकली असतीच असें नाहीं. या दृष्टीनें ही हुकूमशाही होत नाहीं.

कोणत्याहि माळ्या धंद्याचें राष्ट्रीयीकरण करणार नाहीं असें पंतप्रधानांचें आश्वासन होतें, पण त्यानंतर त्याची आवश्यकताच वाटून सरकारनें आयुर्विम्यापासून त्याला सुरुवात केली तर बिघडत नाहीं, कारण एकंदर देशाची रचना समाजवादी करणें व त्याकरितां राष्ट्रीयीकरण करणें हें मूळचें ध्येय बाजूस पडूं शकत नाहीं.

याच दृष्टीनें समाजाला कायद्यानें किती संरक्षण दिलें होतें, कमतरता कांहीं होती कां, असल्यास तेवढा त्यांत बदल करून घेणें इत्यादि प्रश्न राष्ट्रीयीकरण करण्याचें ठरल्यावर त्याची सुरवात ज्या गतीनें होणें जरूर होतें त्याच गतीनें सरकारनें हें पाऊल टाकलें आहे. शिवाय इतर ठिकाणीं म्हणजे युरोपियन देशांत आयुर्विम्याचें राष्ट्रीकरण यशस्वी झालें नाहीं म्हणजे तें आपले येथेंहि होणार नाहीं, असें नाहीं. व त्यावरून येथें तसें पाऊल टाकूं नये असेंहि नाहीं

दैनिक संजय, २६-१-५६

---

**उद्यान कार्यालय, ६१९ शनिवार, पुणें २**

**( व्रतबंध, विवाहादि मंगल कार्यें करणारी संस्था )**

श्री. शंकर हरि थत्ते व सौ. पुष्पा थत्ते ह्यांनीं वरील संस्था स्थापन केली आहे. "विवाहादि मंगलकार्यें करतांना परस्थ लोकांना पुण्यांत आल्यावर कसलाहि त्रास न होतां यथायोग्य खर्चांत हळकुंड, सुपारीपासून पूर्ण तयारी करून कार्य पार पाडण्याची" संस्थेची योजना गतसालीं खूपच यशस्वी झाली, असें तिच्या माहितीपत्रकावरून समजतें. डोहाळे जेवणें, बारसें, मंगळागौर, महालक्ष्मी, हे समारंभहि उद्यानकार्यालयांत थाटामाटांत होतात. सभा, संमेलनें, सहली, पार्ट्या, इत्यादींची व्यवस्थाहि संस्था करते. प्रस्तुत माहितीपत्रकावरून संस्थेच्या कार्याची व तिच्या सेवेबद्दल लोकांनीं काढलेल्या प्रशंसोद्गारांची प्रचीति येईल.

## टाइपरायटरमध्यें क्रांतिकारक बदल

सध्यां वापरांत असलेल्या टाइपरायटर्सचा की-बोर्ड अमेरिकेंत प्रथम व्यापारी प्रमाणावर उत्पादन केलेल्या टाइपरायटरच्या की बोर्डाच्या अनुसरानें तयार केलेला आहे. मूळ उत्पादकाच्या की-बोर्डाची इतर उत्पादकांनीं नक्कल केली व तोच बोर्ड आतां सर्वत्र रूढ झाला आहे. तो खालीलप्रमाणें आहे:—

2 3 4 5 6 7 8 9
Q W E R T Y U I O P
A S D F G H J K L
Z X C V B N M

ह्या की-बोर्डावर दोन्ही हातांच्या बोटानें टाइप करतांना, डाव्या हातांच्या बोटांना ५७% काम पडतें.

वॉशिंग्टन विद्यापीठाचे श्री. ऑगस्ट डोरॅक (Dovrak) ह्यांनीं नवीन की-बोर्ड तयार केला आहे. तो वापरला तर त्यांच्या मतें ५६% काम उजव्या हाताच्या बोटांनीं होईल. त्यांचा की-बोर्ड खालीलप्रमाणें आहे:—

7 5 3 1 9 0 2 4 6 8
P Y F G C R L
A O E U I D H T N S
Q J K X B M W V Z

बहुतेक अक्षरांची जागा बदलण्यांत आली आहे; आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे स्वर मधल्या ओळींत घेण्यांत आले आहेत.

सध्याच्या की बोर्डावर टाइपिस्टची बोटें दररोज पुढें, मागें, वर जाऊन १२ ते २० मैल अंतर तोडतात, असा तज्ञांचा हिशेब आहे. नव्या टाइपरायटरवर हा प्रवास फक्त १ मैल एवढाच करावा लागेल, असें सांगण्यांत येत आहे. नेहमींच्या वापरांतले ३,००० शब्द मधल्या ओळींतील अक्षरांनीं टाइप करतां येतील.

वॉशिंग्टन येथील सरकारी नोकरीमधील कांहीं टाइपिस्टांची नव्या की-बोर्डावर काम करून पहाण्यासाठी मुद्दाम योजना केलेली आहे. सरकारी कचेऱ्यांत ज्या ज्या बनावटीचे टाइपरायटर्स वापरण्यांत येतात, त्या सर्वांवर प्रयोग करण्यांत येत आहे. निवडलेल्या टाइपिस्टांपैकीं निम्मे टाइपिस्ट नव्या की-बोर्डावर कित्येक आठवडे काम करतील व निम्मे जुन्या की बोर्डावर काम करतील. मग त्यांच्यामध्यें स्पर्धा लावून, कोणता की-बोर्ड यशस्वी होतो, हें पहाण्यांत येईल.

नवा की बोर्ड जरी अधिक काम देऊं शकला, तरी सध्यांचा की-बोर्ड बदलण्याचे मार्गांत अतिशय अडचणी आहेत. जगांत सुमारें १,५०,००,००० लोक टाइपरायटर वापरतात, त्या सर्वांची सवय बदलावी लागेल. एकाच कचेरींत दोन प्रकारच्या की-बोर्डाचे टाइपरायटर असले तर गोंधळ उडेल. टाइपिंगच्या शाळांतून दोनहि प्रकारच्या की-बोर्डावर शिक्षण द्यावें लागेल. उत्पादन करणाऱ्या कारखान्यांनाहि उत्पादनाचें तंत्र बदलावें लागेल आणि टाइपिंगच्या गतींत होणारी वाढ हें सर्व करण्याइतकी महत्त्वाची ठरेल किंवा नाहीं ह्याची शंकाच आहे. सध्यांच्या की-बोर्डावर मिनिटाला १०० शब्दांपेक्षा अधिक शब्द टाइप होऊं शकले आहेत.

तमाम दंतरोगांवर
★ नाकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## ग्रामीण आर्थिक जीवनांत सहकारी संस्थांची भूमिका

ग्रामीण विभागांत कर्जपुरवठा करणाऱ्या संस्थांची उणीव असते. रिझर्व्ह बँकेच्या सूचनेवरून अ. भा. ग्रामीण पत-पाहणी समितीनें शेतकऱ्याच्या आर्थिक जीवनांत असलेली सहकारी संस्थांची भूमिका विशेषेंकरून लक्षांत घेऊन ग्रामीण विभागांतील पतविषयक स्थितीची सविस्तर चौकशी केली.

सहकारी ग्रामीण क्रेडिट सोसायट्यांच्या कक्षेंत बहुसंख्य ग्रामीण जनता मोडत नसल्याचें मत या समितीनें व्यक्त केलें. समितीच्या अंदाजानुसार शेतकी भांडवलांतील अवघी ३·१ टक्के रक्कम अशा सोसायट्यांकडून पुरविली गेली.

अशी वस्तुस्थिति असल्यानें ग्रामीण विभागांतील क्रेडिट सोसायट्यांनाच नव्हे तर उत्पादन व खरेदी-विक्री व्यवहार करणाऱ्या सहकारी संस्थांनाहि सरकारनें अधिक प्रमाणांत साह्य दिलें पाहिजे व त्यांत स्वतः सरकारनें सहभागी व्हावयास हवें असें या समितीस वाटलें.

ह्यादृष्टीनें इंपिरिअल बँक ऑफ इंडियाचें राष्ट्रीयीकरण करून आणि तिचें सरकारी बँकेंत रूपान्तर करून, तसेंच ग्रामीण विभागांत ४०० नव्या शाखा उघडण्याचा कार्यक्रम आंखून पहिलें पाऊल टाकण्यांत आलें आहे. यामुळें स्टेट बँकेस आणि रिझर्व्ह बँकेस ग्रामीण पतसंबंधांत अधिक चांगल्या प्रकारें कामगिरी पार पाडतां येईल.

याचवेळीं सहकारी खरेदी-विक्रीस व प्रक्रिया व्यवहारास संरक्षण देण्याकरतां आणि गुदामांत शेतमालाची सांठवण करण्याच्या अनुषंगिक संस्थांची स्थापना करण्यासाठी मध्यवर्ती अन्न व शेतकी खातें योग्य त्या निधींनीशीं नॅशनल को-ऑपरेटिव्ह डेव्हलपमेण्ट ॲण्ड वेअरहाऊसिंग बोर्ड या यंत्रणेची स्थापना करणार आहे.

### ग्रामीण पतविषयक यंत्रणा

ग्रामीण विभागांतील पतविषयक यंत्रणेची वाढ करण्याच्या भारत सरकारच्या योजना दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट करण्यांत येतील.

सहकारी बँका आणि सोसायट्या यांच्या भाग भांडवलास राज्य सरकारांना पैसा देतां यावा म्हणून त्या सरकारांना कर्जें देण्यासाठी रिझर्व्ह बँकेनें दीर्घ मुदतीचा कार्यकारी निधि ( लॉंग टर्म ऑपरेशन फंड ) आणि स्थैर्य निधि ( स्टॅबिलायझेशन फंड ) निर्माण केलेले आहेत. महापूर व अवर्षण यासारख्या नैसर्गिक आपत्तींच्या व दुष्काळाच्या प्रसंगीं या स्थैर्यनिधींतून रक्कम घेण्यांत येईल आणि अल्प मुदतीच्या कर्जाचें मध्यम मुदतीच्या कर्जांत रूपान्तर करण्यासाठीं या रकमेचा विनियोग करण्यांत येईल. अशा रूपान्तरामुळें शेतकऱ्यांना सोयीस्कर हप्त्यांनीं कर्जफेड करणें सुलभ होईल.

प्राथमिक शेतकी क्रेडिट सोसायट्यांची पुनर्घटना करून ५ ते १५ खेड्यांपर्यंतच्या विभागांत त्यांना कार्य करतां यावें अशा दृष्टीनें त्या वाढविण्यांत येतील. त्यांच्यापाशीं पुरेसें भांडवलहि राहील. त्यानंतर अशा सर्व सोसायट्यांचें जिल्हा पातळीवर सहकारी मध्यवर्ती बँकांत संयुक्तीकरण करण्यांत येईल. पुढें याहि जिल्हा बँका प्रत्येक राज्याच्या सर्वोच्च सहकारी बँकेस संलग्न केलेल्या असतील. या सर्व संस्थांच्या भाग भांडवलांत राज्य सरकारें बराचसा पैसा गुंतवितील.

अशाच प्रकारें प्रत्येक राज्यांत एक मध्यवर्ति लँडमॉर्गेज बँक राहील. शक्य त्या ठिकाणीं त्या बँकेच्या शाखा अगर प्राथमिक लँड मॉर्गेज बँका काढण्यांत येऊन त्यांच्यामार्फत ही मध्यवर्ति बँक आपला व्यवहार चालवील. या बँकांच्या कामामुळें पूर्वीपेक्षा उत्पादनास अधिक चालना मिळेल आणि म्हणून या बँकांतील नोकरवर्ग वाढवावा लागेल. या वाढणाऱ्या नोकरवर्गावरील खर्च भागविण्यासाठी राज्यांकडून आर्थिक साह्य देण्यांत येईल.

### मार्केटिंग सोसायट्या

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेसाठी तयार करण्यांत आलेल्या सहकारी संस्थांच्या विकास-कार्यक्रमांत, बाजाराच्या क्षेत्रांत मोडणाऱ्या प्रत्येक विभागांत एक याप्रमाणें सुमारें १,७०० प्राथमिक शेतकी मार्केटिंग सोसायट्या काढण्याचा संकल्प आहे.

ह्या मार्केटिंग सोसायट्यांना सुमारें १२,००० मोठ्या शेतकी क्रेडिट सोसायट्यांची मदत होईल. कर्जपुरवठ्याच्या कामाबरोबरच या सोसायट्या एक एजन्सी म्हणून शेतमालाचें वाटप आणि विक्री करण्यासाठी शेतमालाचें संकलन करण्याचेंहि काम करतील. अशा प्रकारच्या मार्केटिंग आणि क्रेडिट सोसायट्यांकडे माल सांठवणीसाठी छोटीं छोटीं गुदामं असतील. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या मुदतींत अशीं सुमारें ६,००० गुदामें बांधण्यांत यावयाचीं आहेत. त्यांच्या जोडीस परवाना दिलेलीं कोठारेंहि राहणार असून १९६०-६१ पर्यंत अशीं सुमारें ३५० कोठारें तयार होतील असा अंदाज आहे.

शेतकऱ्याच्या उत्पन्नांत वाढ करावी आणि शेतमालाची मागणी अधिक चांगल्या प्रकारें पूर्ण करतां येईल अशा स्थितींत तो बाजारांत आणावा म्हणून शक्य त्या शेतमालावर सहकारी पद्धतीनें प्रक्रिया करावी असें वाटत आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत कांहीं थोडे साखर कारखाने, कापूस, पिंजण गिरण्या, तेल गाळण्याच्या गिरण्या, तागाचे गठ्ठे बांधण्याच्या गिरण्या, सहकारी तत्त्वावर स्थापन करण्यांत येतील.

### प्रशिक्षणाचा कार्यक्रम

निरनिराळ्या कार्यक्षेत्रांत सहकारी चळवळ योग्य रीतीनें चालविणाऱ्या शिक्षित व्यक्तींची कमतरता असणें ही सहकारी संस्थांच्या विकासांतील फार मोठी उणीव आहे. ही उणीव दूर करण्यासाठा रिझर्व्ह बँकेच्या सहकार्यानें भारत सरकारनें १९५३ मध्यें सहकारी प्रशिक्षणाची मध्यवर्ति समिति स्थापन केली. या समितीनें सर्व प्रकारच्या नोकरवर्गासाठी सहकारी प्रशिक्षणाचा कार्यक्रम आंखला आहे.

सदर समितीनें तयार केलेल्या योजनेंत पुढीलप्रमाणें तीन गट आहेतः—( १ ) उच्च श्रेणीचे नोकर, ( २ ) मध्यम श्रेणींतील नोकर आणि ( ३ ) कनिष्ठ श्रेणींतील नोकर. पहिल्या दोन प्रशिक्षण वर्गास आर्थिक साह्य देण्याची जबाबदारी रिझर्व्ह बँकेनें पत्करली आहे. उच्च श्रेणीच्या नोकरांना शिक्षण देण्याची सोय पुणें येथें अ. भा. सहकारी महाविद्यालयांत असून उरलेल्या दोन गटांतील नोकरवर्गाच्या शिक्षणासाठी प्रादेशिक संस्था आणि शाळा उघडण्यांत येत आहेत.

आठ प्रादेशिक प्र. शिक्षण केंद्रांत प्रतिवर्षा राष्ट्रीय विस्तार संघटनेंतील ८०० गटांतील सहकारी अधिकाऱ्यांच्या शिक्षणाची सोय आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत संकल्पिलेल्या मार्केटिंग व गुदामव्यवस्थेच्या विस्तार-योजना लक्षांत घेऊन या विषयाचे

खास शिक्षणवर्ग यांच केंद्रांत चालविण्याचा विचार आहे. मद्रास येथील प्र. शिक्षणकेंद्रांत लवकरच लँड मॉर्गेज बँकिंगचा खास शिक्षणवर्ग सुरू करण्यांत यावयाचा आहे.

सहकारी संस्थांचे सदस्य आणि पदाधिकारी यांना शिक्षण देण्यासाठीं ऑल इंडिया को-ऑपरेटिव्ह युनियननें तयार केलेली एक योजना कांहीं थोड्या राज्यांत प्रयोग म्हणून अंमलांत आणण्यांत येणार आहे.

### सहकारी शेती

छोट्या शेत-तुकड्यांवर शेतकी करण्यांतील अंगभूत तोटे भरून काढून ती अधिक कार्यक्षमतेनें करण्यास सहकारी शेती हाच एक उपाय होय असें मान्य करण्यांत आलेलें आहे. भारतांत सहकारी शेती अजून प्रयोगावस्थेंतच असली तरी उत्पादन वाढीची तिच्या योगेंच फार मोठी शक्यता असून शेतकऱ्यांची आर्थिक स्थिति सुधारण्यास तीमुळें साह्य होईल.

छोट्या आणि मध्यम स्थितींतील शेतमालकांना एकत्र येऊन सहकारी शेतकी सोसायट्या काढण्यासाठी साह्य देण्यांत यावें व राज्य सरकारांनीं त्यांना खास सवलती याव्यात अशी शिफारस नियोजन मंडळानें केली आहे. तसेंच, शेतविहीन शेत मजूर आणि छोटे शेतकरी यांच्या गटांना सहकारी तत्त्वावर स्थायिक होण्याकरतां शक्य असेल तेथें नव्यानें लागवडीस आणलेल्या आणि लागवडीयोग्य जमिनी त्यांच्यासाठी राखून ठेवण्यांत याव्यात अशीहि सूचना या मंडळानें केली आहे.

सहकारी शेतीच्या विकासासाठी संघटित व पद्धतशीर प्रयत्न आतांपर्यंत मुंबई आणि उत्तरप्रदेश यांसारख्या अगदीं मोजक्या राज्यांतच करण्यांत आलेले आहेत.

### मासे गोठविण्याचा कारखाना

सौराष्ट्रांतील जामनगरजवळच्या एका बंदरांत मासे गोठविण्याचा कारखाना काढण्यांत येणार आहे. ह्या उपक्रमाला मुंबईच्या एका उद्योगपतीनें हात घातला असून त्यानें आखलेल्या योजनेप्रमाणें कारखान्यासंबंधीच्या प्राथमिक कार्याला लवकरच आरंभ होणार आहे. सौराष्ट्र आणि कच्छ जवळच्या समुद्रांत सांपडणाऱ्या मासळीला अमेरिकेंत चांगली मागणी येते. पण हा धंदा आधुनिक पद्धतीनें करण्याचा प्रयत्न अद्याप करण्यांत आलेला नाहीं धंद्याच्या वाढीला भरपूर वाव असून त्याचा अजून फारसा फायदाहि घेण्यांत आलेला नाहीं. अमेरिका आणि भारत ह्यांच्या दरम्यान तांत्रिक साह्याचा करार करण्यांत आलेला आहे. तांत्रिक मदत देण्याच्या कार्यक्रमाप्रमाणें ह्या धंद्यासाठी अमेरिकेकडून कांहीं यंत्रसामुग्री मिळण्याचा संभव आहे. चालू महिन्यांत सौराष्ट्र सरकारला अमेरिकेकडून मच्छीमारीच्या सामुग्रीनें सुसज्ज अशा चार बोटी मिळणार आहेत, असें समजतें. बोटी सौराष्ट्राचे मुख्यप्रधान श्री. रसिकलाल पारेख ह्यांच्या हवालीं औपचारिकरीत्या करण्यांत येतील. सौराष्ट्राजवळील समुद्रांत मच्छीमारीच्या धंद्याचा विकास करण्यास भरपूर वाव आहे. धंद्याचा विकास पूर्णपणें व टप्याटप्प्यानें करण्यांत आल्यावर दरसाल सुमारें १०,००० टन मासे गोठवितां येईल असा अंदाज करण्यांत आलेला आहे. पहिल्या वर्षी ४०० टन गोठविलेले मासे अमेरिकेला निर्यात करण्यांत येतील. परंतु दरवर्षी ह्या निर्यातींत सुमारें १,००० टनांची वाढ करण्याची शक्यता आहे. गोठलेल्या माशांच्या निर्यातीमुळें भारताला डॉलरसारख्या महत्त्वाच्या परदेशीय चलनाची प्राप्ति होईल. कारखाना उभा करण्यासाठी अंदाजें ३० लाख रुपये भांडवल लागेल.

**मदत वाया जात आहे**—संयुक्त-राष्ट्र-संघटनेच्या जागतिक आरोग्य-संघटनेचे माजी डायरेक्टर डॉ. चिशोल्म एका प्रसंगीं बोलतांना म्हणाले कीं, संपन्न देशांकडून अविकसित देशांना मदत म्हणून जो पैसा देण्यांत येतो त्यापैकीं बराच पैसा वाया जात आहे. अप्रगत देशांत परकीय तज्ज्ञ पाठवून कांहीं उपयोग होत नाहीं. त्यांची पाठ फिरल्याबरोबर तेथें पहिलीच परिस्थिति उत्पन्न होते.

**अणुशक्तीवर चालणाऱ्या बोटी**—जर्मनींतील सुप्रसिद्ध क्रुप्स कारखान्यांत अणुशक्तीवर चालणाऱ्या बोटी बांधण्यासाठी तयारी करण्यांत येत आहे. अणुशक्तीच्या साह्यानें पाण्याची वाफ करून तिच्या जोरावर बोटींचीं एंजिनें चालविण्यांत येतील. अशा प्रकारची बोट तयार झाली तर तीवर इतर बोटींच्या मानानें अधिक मोकळी जागा राहील. कारण, अणुशक्ति पुरविणारें इंधन फारच थोडें पुरतें.

---


## महाराष्ट्र रीजनल को-ऑपरेटिव्ह स्कूल, पुणें १

(नं. १० बी. जे. रोड, टाटा लॉज, पुणें १)

या विद्यालयाचा पुढील शिक्षणवर्ग २ एप्रिल १९५६ रोजीं सुरू होईल. विद्यालयांत सुपरवायझर, बँक इन्स्पेक्टर, असिस्टंट को-ऑपरेटिव्ह ऑफिसर, खरेदी-विक्री संघ आणि विविध कार्यकारी सहकारी सोसायटी वगैरे संस्थांचे सेक्रेटरी या दर्जाचे नोकरवर्गांना शिक्षण दिलें जातें. विद्यालयाचा शिक्षणक्रम आठ महिने मुदतीचा आहे. सहकारी सोसायट्या व सहकारी खात्यामध्यें नोकरी करणाऱ्यांना प्रवेश देतांना अधिक पसंति दिली जाते. शिवाय जागा शिल्लक असल्यास एस. एस. सी. उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळूं शकेल. सहकारी सोसायटींत काम करणारे विद्यार्थी एस. एस. सी. उत्तीर्ण नसल्यास त्यांनीं सहकारी संस्थेंत कमींतकमी तीन वर्षे नोकरी केली असली पाहिजे.

इन्स्टिट्यूटचे नियमानुसार वर्गांतील शिक्षणाचे मुदतींत दरमहा रु. ४० प्रमाणें एकूण ८० विद्यार्थ्यांना विद्यावेतन देण्यांत येईल, आणि प्रात्यक्षिक शिक्षणाचे वेळीं दरमहा रु. ३० प्रमाणें प्रवासभत्ता देण्यांत येईल.

सहकारी संस्थांचे उमेदवारांनीं आपल्या संस्थेच्या ठरावाचे खऱ्या नक्कलीसह प्रवेशअर्ज आपल्या जिल्ह्याचे जिल्हा सहकारी बोर्डामार्फत आमच्याकडे दि. १ मार्च १९५६ पूर्वी पोहोंचतील अशा अंदाजानें पाठवावेत. परस्पर व वरील तारखेनंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाहीं. विद्यालयांत आलेले सर्व अर्ज महाराष्ट्र डिव्हिजनल को-ऑपरेटिव्ह बोर्डाकडे पाठविण्यांत येतील आणि उमेदवारांच्या निवडीसंबंधींचा त्यांचा निर्णय अंतिम राहील. प्रवेशअर्जासोबत रु. १० प्रवेश फी पाठविणें आवश्यक आहे.

विद्यालयाचे फॉर्म व माहितीपत्रकें विद्यालयाचे कचेरींत सुट्टीचे दिवसाखेरीज रोज ११॥ ते ५ चे दरम्यान मिळूं शकतील. अर्जांची मागणी करतेवेळीं चार आणे रोख भरणें किंवा चार आण्यांचीं पोस्टांचीं तिकिटें पाठविणें आवश्यक आहे.

पुणें-१ मा. वि. मद्दाने
दि. १-२-५६ सुपरिन्टेन्डेन्ट.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५११ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.